# FIRST INFORMATION REPORT
## (Under Section 154 Cr.P.C.)
## प्रथम खबर अहवाल
## (कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** जालना **P.S.(ठाणे):** कदीम -जालना **Year (वर्ष):** 2024
   **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0196
   **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**24/05/2024 20:45

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिनांक पासून):** 23/05/2024
      **Date To ( दिनांक पर्यंत):** 23/05/2024
      **Time Period (कालावधी):** पहर 6 **Time From (वेळेपासून):** 17:34 बजे
      **Time To (वेळेपर्यंत):** 17:59 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
      **Date (दिनांक ):** 24/05/2024 **Time (वेळ):** 20:00 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
      **Entry No. (नोंद क्र.):** 033
      **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 24/05/2024 20:32 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
      पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**
   (b) **Address (पत्ता):** घाटी रोड येथील तलाठी कैलास ,ढाकणे यांच्या तलाठी कार्यालयात

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
      **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
      **District(State) (जिल्हा(राज्य)):**



CamScanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** ज्ञानेश्वर हरिश्चंद्र राठोड

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1993

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | निरखेडा ता जि जालना ,कदीम -जालना,जालना,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | निरखेडा ता जि जालना ,कदीम -जालना,जालना,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9011168812

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | कैलास खंडुजी ढाकणे | | | 1. रायगड शांती गस समोर जालना ,वर्ग 3,कदीम -जालना,जालना, महाराष्ट्र,भारत |
| 2 | सुदर्शन दादाराव वाढेकर | | | 1. जामवाडी ताजिजालना ,कदीम -जालना,जालना,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | औषध/अमलीपदार्थ | अल्कोहोल | आर.एस.कंपनीची विदेशी दारुची | 180.00 |



CamScanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| | | | कटर. | |
| 2 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | अँथ्रासिन पावडर लागलेली दिड हजार रुपये लाचेची रक्कम | 1,500.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

1,680.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

दिनांक- 24.05/24 फिर्याद
मी ज्ञानेश्वर हरिश्चंद्र राठोड वय 31 वर्ष, व्यवसाय – शेती रा. निरखेडा ता. जि. जालना. मोबाईल नंबर 9011168812.
समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणी माझे कुटुंबासह राहण्यास आहे. मौजे निरखेडा शिवारात श्रीमती जनाबाई गणेश पवार यांचे नावावर शेती गट क्रमांक 109 मध्ये 00 हेक्टर 56 आर शेतजमिनी आहे. मी श्रीमती जनाबाई गणेश पवार यांच्याकडुन त्यांचे नावावरील शेती गट क्रमांक 109 मधील 00 हेक्टर 56 आर शतजमीनी पैकी 00 हेक्टर 24 आर शेतजीन 2,40,000/- ( दोन लाख चाळीस हजार ) रुपयास विकत घेतली असुन सदर शेतजमीनीचे खरेदीखत दिनांक 21.03.2024 रोजी करण्यात आलेले आहे.
मी श्रीमती जनाबाई गणेश पवार यांच्याकडुन मौजे निरखेडा शिवारातील शेती गट क्रमांक 109 मधील 00 हेक्टर 24 आर शेतजमीन विकत घेतली त्यानंतर सदर जमिनीचे 7/12 वरती माझे नावाचा फेर घेण्यासाठी मी मौजे निरखेडा गावाचे तलाठी श्री. कैलास ढाकणे यांना दिनांक 22.03.2024 रोजी घाटी रोड येथील त्यांचे कार्यालयात जावुन भेटलो. त्यावेळी मी तलाठी ढाकणे यांना मी खरेदी केलेल्या शेती गट क्रमांक 109 मधील 00 हेक्टर 24 आर शेतजमीनीचे खरेदीखताच्या कागदपत्राची झेरॉक्स दिली व त्यांना 7/12 वरती माझे नावाचा फेर घेण्यासाठी सांगीतले. त्यावेळी तलाठी ढाकणे यांनी मला तुझ्या जमीनीचा फेर घेतो त्यासाठी तुला मला 2000/- रुपये दयावे लागतील तरच मी तुझ्या शेतीचा फेर घईल नाहीतर फेर घेणार नाही असे म्हणाले. त्यावेळी माझे जवळ 2000/- रुपये नव्हते तसेच तलाठी ढाकणे मला मागत असलेले पैसे हे लाचेचे पैसे असल्यामुळे मला त्यांना लाचेचे पैसे देण्याची इच्छा नसल्यामुळे मी त्यांना सध्या माझ्याकडे पैसे नाहीत असे म्हणुन तेथुन मी माझे गावी गेलो. माझे शेतीमध्ये काम असल्यामुळे व आवकाळी पाउस पडल्यामुळे मी शेती कामामध्ये होतो. त्यानंतर दिनांक 22.04.2024 रोजी मी तलाठी कैलास ढाकणे यांना माझे शेतीचा फेर घेतला आहे काय याबाबत विचारपुस करण्यासाठी त्यांचे ऑफीस मध्ये गेलो. त्यावेळी तलाठी ढाकणे यांनी मला मी महत्वाचे कामात आहे. तु उदया दुपार नंतर ऑफिसला ये त्या ठिकाणी तुझ्या शेतीचा फेर घेण्याबाबत बोलु असे सांगीतले. त्यानंतर मी माझे गावी आलो. माझे मध्ये व तलाठी कैलास ढाकणे यांच्या मध्ये पैशाबाबत कोणत्याही प्रकारच्या उसनवारीचा व्यवहार झालेला नाही. तसेच त्यांच्या मध्ये व माझ्यामध्ये कोणत्या ही प्रकारचा वादविवाद झालेला नाही. तरी आज दिनांक 23.04.2024 रोजी दुपारनंतर मला तलाठी कैलास ढाकणे यांनी त्यांचे घाटी रोड जालना येथील तलाठी ऑफिस मध्ये बोलविले असुन मी त्यांना त्यांचे कार्यालयात भेटण्यासाठी जाणार आहे व त्यांना भेटुन मी खरेदी केलेल्या शेती गट क्रमांक 109 चा फेर माझ्या नावे घेण्याबाबत बोलणार आहे. त्यावेळी मला तलाठी कैलास ढाकणे यांनी स्वता अथवा इतरामार्फत पैशाची मागणी केल्यास त्यांचेवरती कायदेशीर कारवाई करण्यात यावी म्हणुन त्यांचे विरध्द माझी तक्रार आहे. अशा स्वरुपाची लेखी तक्रार स्व हस्ताक्षरात दिली आहे सदर लेखी तक्रारी बरोबर तक्रारदार श्री. ज्ञानेश्वर राठोड यांनी श्रीमती जनाबाई गणेश पवार यांच्याकडुन शेती गट क्रमांक 109 मधील 00 हेक्टर 24 आर शेतजमीन खरेदी केल्याबाबतच्या खरेदीखताची छायांकीत प्रत दिली. सदर छायांकीत प्रतीवर तक्रारदार, दोन्ही पंच व पोलीस निरिक्षक श्री. मुटेकर यांनी सहया केल्या. त्यानंतर तक्रार व नमुदचे छायांकीत कागदपत्र पोलीस निरिक्षक श्री. मुटेकर साहेब यांच्याकडे दिल्या.दिनांक 23.04.2024 रोजी मी तलाठी कैलास ढाकणे यांचे विरुध्द दिलेली



CS CamScanner

तक्रार खरी आहे काय व ते मला लाच मागतात काय याची खात्री करण्यासाठी तलाठी कार्यालय घाटी रोड जालना येथे पंचासमक्ष जावुन लाचमागणी पडताळणी करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानंतर एक नवीन मेमरी कार्ड डीजीटल व्हाईस रेकॉर्डर मशिन मध्ये टाकुन व्हाईस रेकॉर्डीग चालु करुन व्हाईस रेकॉर्डीग मशिन कोणालाही दिसणार नाही अशा रितीने माझ्या पॅन्टच्या आत करदुडयाला बांधली. त्यानंतर मी व पंच क्र. 01 श्री. रामप्रसाद थापडे असे दोघे मोटर सायकलने तलाठी श्री. कैलास ढाकणे यांना त्यांचे कार्यालयात भेटण्यासाठी गेलो. तलाठी ढाकणे यांच्या कार्यालयात मी व पंच क्रमांक 01 रामप्रसाद थापडे असे गेल्यानंतर मी तलाठी श्री. ढाकणे यांना भेटलो. त्यावेळी मी त्यांचे सोबत श्रीमती जनाबाई गणेश पवार यांच्याकडुन खरेदी केलेल्या शेती गट क्रमांक 109 मधील 00 हेक्टर 24 आर जमिनीचे रजिस्ट्री बाबत बोलत असताना तलाठी श्री. ढाकणे मला म्हणाले की, “ मलं पैसे दिले नाही.. मलं पैसे दिले नाही ना ”. त्यावेळी मी तलाठी ढाकणे यांना म्हणालो की, “ साहेब मी काय म्हणलं तुम्हाला पैसे देतो म्हणलं दुस-या दिशी देतो म्हणलं. किती दयायचे म्हणल न मंग हो साहेब. किती दयावा लागल मंग ”. त्यावेळी तलाठी ढाकणे मला म्हणाले की, “ दोन हजार रुपये ”. त्यावेळी मी तलाढी ढाकणे यांना म्हणालो की, “ दोन हजार लय झाले ना हो साहेब, गोर गरीब मानसाकडुन बी असं. हजार एक रुपये घ्यायला पाहीजे ”. त्यावेळी तलाठी ढाकणे मला म्हणाले की, “ दिड दे ”. त्यावेळी मी तलाठी ढाकणे यांना म्हणालो की, “ हजार एक रुपये घ्या साहेब ”. कसं हय मी लय गरीब माणुस है हो साहेब. त्यावेळी तलाठी ढाकणे मला म्हणाले की, “ जमीन खरेदी केली म्हणे. दिड हजार रुपये लय झालते. तुम्ही म्हणले न म्हणलं आलो फोन कराल ”. त्यावेळी तलाठी ढाकणे यांचे कार्यालयातील खाजगी इसम सुदर्शन वाडेकर मला म्हणाला की, “ त्या दिवशी नंतर देतो म्हणी ”. त्यावेळी तलाठी ढाकणे “ हा ” असे म्हणाले. त्यावेळी मी तलाठी ढाकणे यांना म्हणालो की, “ ते नंबर बी विषय.. काय पैसे जवळ पाहीजे नं ”. त्यावेळी तलाठी ढाकणे मला म्हणाले की, “ मंग आज हाय का नाही ”. त्यावेळी मी तलाठी ढाकणे यांना म्हणालो की, “ मी त देतो तुम्हाला आणुन पैसे आता पाच दहा मिनिटात सतकर वरुन काढुन देतो ” असे म्हणाले. त्यावेळी तलाठी ढाकणे यांनी खाजगी इसम सुदर्शन वाडेकर याचे कडे बोटाव्दारे इशारा करुन याला सोबत घेवुन दोघे सतकरला जा ” असे म्हणाले. मी तलाठी ढाकणे यांच्या कार्यालयातुन बाहेर आलो. त्यावेळी तलाठी कार्यालयातील खाजगी इसम सुदर्शन वाडेकर हा सुध्दा बाहेर आला. त्यावेळी खाजगी इसम सुदर्शन वाडेकर मला म्हणाला की, “ ते आर.एस. सांगीतली साहेबांन. कॉटर येताना घेवुन या..कॉटर ” असे म्हणाला.

तलाठी ढाकणे यांनी माझ्याकडे मी खरेदी केलेल्या शेतजमीनीचा फेर घेण्यासाठी 2000/- ( दोन हजार ) रुपयाची मागणी करुन तडजोडी अंती 1500/- ( दिड हजार ) रुपये स्विकारण्याचे मान्य केले. तसेच तलाठी ढाकणे यांचे कार्यालयातील खाजगी इसम सुदर्शन वाडेकर याने मला तलाठी ढाकणे यांनी आर.एस. कंपनीच्या विदेशी दारुची कॉटर घेवुन येण्यास सांगीतले असल्याचे सांगीतल्याने मी तलाठी श्री. ढाकणे यांच्या कार्यालयातुन अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालय जालना येथे आलो.त्यानंतर तलाठी ढाकणे यांनी लाच मागणी केल्याप्रमाणे अँन्थ्रासिन पावडर लावलेली लाचेची रक्कम 1,500/- रुपये माझे अंगातील जीन्स पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिशात ठेवलेली. त्यावेळी माझे मोबाईल नंबर वरती तलाठी श्री. ढाकणे यांचा मोबाईल नंबर 7972206770 वरुन फोन येवुन बंद झाल्याने दोन्ही पंचासमक्ष मी माझा मोबाईल नंबर 9011168812 वरुन तलाठी ढाकणे यांचा मोबाईल नंबर 7972206770 वरती फोन करुन मोबाईल फोनचा आवाज मोठा करुन तलाठी ढाकणे यांच्या सोबत बोलणे केले त्यावेळी तलाठी ढाकणे मला म्हणाले की, “ काय झाल ”. त्यावेळी मी तलाठी ढाकणे यांना म्हणालो की, “ भेटले पैसे भाउ. भाउकडं आलतो. ATM हुन निघना भाउकुन आणु राहीलो आलोच”. त्यावेळी तलाठी ढाकणे म्हणालो की, “ आर जाउ का थांबु ”. त्यावेळी मी तलाठी ढाकणे यांना म्हणाले की, “ एक पाच मिनिटात आलो सर ”. त्यावेळी तलाठी ढाकणे “ बर ” असे म्हणाले व फोन बंद केला. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डीग मशिन कोणालाही दिसणार नाही अशा रितीने माझ्या पॅन्टच्या आत करदुडयाला बांधली. त्यानंतर मी पंच क्रमांक 01 श्री. रामप्रसाद थापडे यांच्यासोबत तलाठी ढाकणे यांच्या घाटी रोड जालना येथील कार्यालयात गेलो असता तलाठी कार्यालय बंद असल्याने कार्यालयाचे बाहेर आलो. त्यावेळी तलाठी कार्यालयाचे समोर रोडच्या बाजुला उभ्या उसलेल्या कार मध्ये तलाठी श्री. ढाकणे हे ड्रायव्हर सिट वरती व त्यांचे बाजुच्या सिटवरती खाजगी इसम सुदर्शन वाडेकर हे बसलेले दिसल्याने मी तलाठी श्री. ढाकणे यांच्याकडे जावुन त्याचे सोबत बोलु लागलो त्यावेळी पंच क्रमांक 01 श्री. थापडे हे माझ्याजवळच उभे होते. त्यावेळी तलाठी श्री. ढाकणे व त्यांचे कार्यालयातील खाजगी इसम सुदर्शन वाडेकर यांनी आमच्याकडे संशयीत नजरेने बघुन एकमेकाकडे पाहीले. त्यावेळी तलाठी ढाकणे यांनी माझ्याकडे पाहत “ मी चाबी आनतो.. चाबी म्हणलं ” असे म्हणाले. त्यावेळी मी तलाठी ढाकणे यांना, “ मंग पैसे घेउन टाका न मलं जाउ दया न मी ” असे म्हणालो. त्यावेळी तलाठी श्री. ढाकणे यांनी आमच्याकडे संशयीत नजरेने पाहत त्यांचे गाडीची काच वरती करुन गाडी चालु करुन तेथुन निघुन गेले त्यानंतर ते परत आले नाहीत त्याबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.दिनांक 23.04.2024 रोजी तलाठी श्री. कैलास ढाकणे यांचे कार्यालयातील खाजगी इसम श्री. सुदर्शन



CamScanner

वाडेकर यांनी तलाठी श्री. ढाकणे यांचे साठी आर.एस. विदेशी दारुची कॉटर घेवुन येण्यास सांगीतली असल्याने त्या दिवशी माझ्याकडे आर.एस. विदेशी दारुची कॉटर विकत घेण्याइतपत पुरेस पैसे नसल्यामुळे मी दिनांक 29.04.2024 रोजी आर.एस. या विदेशी दारुची कॉटर रुपम वाईन शॉप येथुन विकत घेतली.त्यानंतर दिनांक 30.04.2024 रोजी अँन्थ्रासिन पावडर लावलेली लाचेची रक्कम 1,500/- रुपये माझे अंगातील जीन्स पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिशात ठेवलेली व आर.एस कंपनीची विदेशी दारुची कॉटर माझे जवळील कापडी थैली मध्ये ठेवली. त्यानंतर डीजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु करुन ते माझे बनियनला बांधण्यात आले. त्यानंतर मी पंच क्रमांक 01 श्री. बेग यांचे सोबत आमच्या जवळील मोटर सायकल वरती तलाठी श्री. कैलास ढाकणे व त्यांचे सोबतचे खाजगी इसम सुदर्शन वाडेकर यांना भेटण्यासाठी त्यांचे घाटी रोड जालना येथील तलाठी कार्यालयात गेलो व तलाठी ढाकणे यांच्यासोबत शेतीच्या सातबारा बद्दल बोललो त्यावेळी तलाठी कैलास ढाकण यांनी मला बाहेरुन सातबारा काढण्यास सांगीतले. त्यावेळी मी त्यांना पाहुण्याकडुन पैसे माघाय उशीर झाला. आर.एस आणली होती असे म्हणालो. त्यावेळी तलाठी ढाकणे यांनी " पैशाच काही नाही, झाल तुमचं... झाल ते काढुन घ्याणं..." असे म्हणाले व कार्यालयातुन खाजगी इसम श्री. सुदर्शन वाडेकर यांचे सोबत मोटर सायकल वरती निघुन गेले. त्यानंतर मी तलाठी श्री. कैलास ढाकणे यांच्या मोबाईल वरती फोन केला. त्यावेळी मी तलाठी श्री. कैलास ढाकणे यांना हे तुम्ही माघीतल्या प्रमाण पैसे न कॉटर त घेवुन जाणं मंग.. असे म्हणालो. त्यावेळी तलाठी ढाकणे यांनी त्यांचा मोबाईल फोन बंद केला. त्यानंतर ते परत आले नाहीत त्यामुळे सापळा कारवाई थांबविली. त्याबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.त्यानंतर आज दिनांक 24.05.2024 रोजी अँन्थ्रासिन पावडर लावलेली लाचेची रक्कम 1,500/- रुपये माझे अंगातील जीन्स पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिशात ठेवलेली व आर.एस कंपनीची विदेशी दारुची कॉटर माझे जवळील कापडी थैली मध्ये ठेवली. त्यानंतर डीजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु करुन ते माझे बनियनला बांधण्यात आले. त्यानंतर मी पंच क्रमांक 01 श्री. गवळी यांचे सोबत आमच्या जवळील मोटर सायकल वरती तलाठी श्री. कैलास ढाकणे व त्यांचे सोबतचे खाजगी इसम सुदर्शन वाडेकर यांना भेटण्यासाठी त्यांचे घाटी रोड जालना येथील तलाठी कार्यालयात गेलो. त्या ठिकाणी जावुन मी तलाठी श्री. कैलास ढाकणे यांना भेटलो. त्यावेळी तलाठी ढाकणे यांच्या सोबत माझे शेतीची फेरफारची नक्कल व सातबारा बाबत बोलणे झाले. त्यावेळी मी तलाठी ढाकणे यांना मागच्या फेरचे पैसे असे म्हणालो.टीपु- सीसीटिएनएस प्रणाली मध्ये शब्दाची मर्यादा असल्याने उर्वरीत फिर्याद सोबत जोडण्यात आली आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

sidharth jabaji mane(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**



CamScanner

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): sidharth jabaji mane
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):



CamScanner